महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/१३/२०१५/00362 दिनांक- २३.०७.२०१५

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/१३/२०१५

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

अपीलकर्ता

श्री. रमेश देवराम टाकळकर
मु.पो. ग्राहक मार्गदर्शन सेवा केंद्र,
शिक्रापुर, ता. शिरूर, जि. पुणे.

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख : २०.०५.२०१४

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख : १९.०६.२०१५

प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : २९.०६.२०१५

**मागितलेली माहिती :**

१. पुणे व कोल्हापूर येथील वीज ग्राहक गाऱ्हाणी निवारण मंचावर ग्राहक प्रतिनिधींच्या सदस्य म्हणुन नेमणुकीसाठी महावितरणने केलेल्या शिफारस पत्राच्या व नेमणुक केलेल्या प्रविनिधींच्या प्रस्तावाच्या छायांकित प्रति मिळाव्यात.
२. CGRF पुणे, कोल्हापूर येथील शिफारशी केलेल्या प्रतिनिधींची मुलाखती घेतल्या असल्यास दिनांकासह टिपणे मिळावीत तसेच नियुक्त केलेले प्रतिनिधी ज्या ग्राहक संघटनेचे आहेत त्यांच्या रजि. नं. सह शिफारस पत्राची छायांकित प्रत मिळावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. मविनिआ/माअअ/६८/२०१५/२४६ दि.१९.०६.२०१५ नुसार अपिलार्थी यांना दिलेली माहिती येणे प्रमाणे -

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती आपणांस पुरविणेसाठी माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियम), नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठ | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकुण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकुण रु. |
|---|---|---|---|---|
| ९४ | २ | १८८ | अंदाजे रु.२०० | ३५८/- |
| | | | एकुण रु. | ३५८/- |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

वरील प्रमाणे आकारलेले शुल्क (फी) आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती /चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या प्रती उपलब्ध करुन घ्यावेत. तद्नंतर माहिती अधिकारी यांनी फी प्राप्तीनंतर दि. १४.०७.२०१५ रोजी अर्जदार यांना या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

१) माहिती मिळाली नाही २) माहिती देण्यास हेतुपूरस्पर टाळाटाळ, अपिलीय अधिकारी नाव, पत्ता सांगितला नाही अपिलाचा कालावधी सांगितला नाही

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-**

मागितलेली माहिती वरिल नमूद केलेल्या कारणांकरिता अपीलकर्ता यांनी अपील दाखल केले आहे.

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. २२.०७.२०१५ रोजी दुपारी २.३० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले. अपिलार्थी सुनावणीस गैरहजर.

अपिलावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांना दि. १४.०७.२०१५ रोजी माहिती अधिकारी यांनी या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे. माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येते की, त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नाव व पत्ता यापुढे अचूकपणे नमूद करावा. तसेच अपिलाचा कालावधी सुध्दा माहिती अधिकारांतर्गत अर्जदाराला कळविण्यात यावे. सदरहू अपिलातील दोन्ही मुदयांवरती अपिल निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करु शकता.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा**
**प्रथम अपीलीय अधिकारी.**

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.